# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 18/01/2022 (मंगळवार)

(सायंकाळ)

---

## ट्रक चोरी करणाऱ्या आरोपीला अटक
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कारवाई

दि. 16.01.2022 चे 13.38 वा. फिर्यादी नामे– रामप्रसाद नागोजी पार्धी वय 54 वर्ष रा.शंकर नगर कांद्री वार्ड क्.6 कन्हान यांनी पो.स्टे. कन्हान येथे येवून रिपोर्ट दिली की, त्यांचा ट्रक चालक याने दि. 15.01.2022 चे 20.30 वा. ते दि. 16.01.22 चे 05.30 वा. दरम्यान आशा पुरा आरा मशीन कांद्री बस स्टॉप जवळ येथुन ट्रकमध्ये अंदाजे 25 टन कोळसा भरून बुरहानपुर येथे घेवुन जाण्यासाठी कोळसाने भरून उभा करून ठेवलेला ट्रक लॉक केलेला होता. ट्रक कं. एम एच–40/ एके– 2419 शेंद्री व पिवळया रंगाचा ट्रक किं. 8,50,000/–रू. व कोळसा अंदाजे 25 टन किं. 1,50,000/–रू. असा एकुण 10,00000/–रू. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले. यावरून पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरूद्ध अप क. 14/22 कलम 379 भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयाच्या समांतर तपासात दि. 18.01.2022 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कन्हान उपविभागात फिरत असतांना त्यांना विश्वसनिय माहिती मिळाली की, ट्रक कं. एम एच–40/ एके– 2419 हा वाहीटोला येथे लावारीस स्थितीत उभा आहे. अश्या खबरेवरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने तेथे जावुन ट्रकची पाहणी केली असता विषयांकीत गुन्हयात चोरीस गेलेला ट्रक असल्याचे समझले त्यावरून ट्रक जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्हयात आरोपी नामे– संजय अशोक कढोते, वय 36 वर्ष, रा. टेकडी कॉलनी, कन्हान हा निषपन्न झाल्याने त्यास तपासादरम्यान अटक करण्यात आले आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे स्था.गु.शा. यांचे नेतृत्वात स.पो.नी. अनिल राऊत, पो.हवा. विनोद काळे, ज्ञानेश्वर राऊत, पोलीस नाईक शैलेश यादव, पो.शी.वीरेंद्र नरड, प्रणय बनाफर, चासफौ साहेबराव बहाळे व पो.स्टे कन्हान येथील पोलिस नाईक सुधीर चव्हाण यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर